2 6 JUN 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीचे आज भूमिपूजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ परिसरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट इमारतीचे भूमिपूजन सोमवारी (दि. २६) दुपारी १२ वाजता राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याहस्ते होणार आहे. भूमिपूजन समारंभास कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के, प्र-कुलगरू डॉ. पी.एस.पाटील प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
26 JUN 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# तरुणांना रोजगाराची संधी

## विद्यापीठातील प्लेसमेंट सेलचे समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांचे प्रतिपादन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर.

जागतिकीकरणाच्या खुल्या आर्थिक धोरणामुळे भारतात परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्या आल्या आहेत. त्यामुळे या कंपन्यांमध्ये स्पर्धा वाढू लागली आहे. यातूनच तरुणांसाठी बाजारपेठेत रोजगाराची संधी आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र अंतर्गत सांगलीतील विभागीय केंद्र, सांगलीतील श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, मिरजमधील कन्या महाविद्यालय आणि सांगलीतील श्रीमती राजमती नेमगोंडा पाटील कन्या महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 'भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि कौशल्य विकास' यावर ऑनलाईन व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक डॉ. डी. के. मोरे होते. प्रा. व्ही. बी. चौगुले यांनी स्वागत केले. डॉ. सुशांत माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. एम. आर. चादरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. जी. बी. चव्हाण यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. आर. जी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. उल्हास माळकर, प्राचार्य डॉ. मानसी गानू, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे, डॉ. के. बी. पाटील, डॉ. चांगदेव बंडगर उपस्थित होते.

16 JUN 2023

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या सहा खेळाडूंची निवड

## जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धा : भारतीय विश्वविद्यालय संघाचे करणार नेतृत्व

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : चीनमधील चेंगडू येथे २८ जुलै ते ८ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या सहा क्रीडापटूंची भारतीय विश्वविद्यालय संघात निवड झाली. विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी ही माहिती दिली.


रेश्मा केवटे


राणी मुचंडी


सुदेश्ना शिवणकर


ओंकार कुंभार


सिद्धांत पुजारी


संदेश कुरळे

या स्पर्धेसाठी भारतीय विश्वविद्यालय संघाची नुकतीच घोषणा करण्यात आली. शिवाजी विद्यापीठाचे खेळाडू ॲथलेटिक्स आणि लॉन टेनिस या दोन क्रीडा प्रकारांत भारताचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

ओंकार कुंभार (नाईट कॉलेज ऑफ कॉमर्स, इचलकरंजी, ८०० मी. धावणे), सिद्धांत पुजारी (आजरा महाविद्यालय, ३००० मी. स्टीपलचेस), सुदेश्ना शिवणकर (यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सातारा, १०० मी. धावणे), रेश्मा केवटे (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन), राणी मुचंडी (डी. पी. भोसले महाविद्यालय, कोरेगाव, हाफ मॅरेथॉन) आणि संदेश कुरळे (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, लॉन टेनिस) या विद्यार्थ्यांची या स्पर्धेसाठी निवड झाली.

> सहा खेळाडूंची एकाचवेळी जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी निवड होणे, हा विद्यापीठाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा क्षण आहे.
>
> - डॉ. दिगंबर शिर्के,
> कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

तरुण भारत

# सिद्धांत पुजारीची जागतिक विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड

कोल्हापूर : चीन येथे होणाऱ्या जागतिक आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी भारतीय संघात आजरा



महाविद्यालयचा खेळाडू सिद्धांत पुजारी याची निवड झाली आहे. त्याला शिवाजी विद्यापीठ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा विभाग संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड, जनता एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष अशोक अण्णा चराटी, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अनिल देशपांडे, रमेश कुरुनकर, डॉ. दीपक सातोस्कर, योगेश पाटील, दिनेश कुरुनकर, विजय पाटील, प्रा. अशोक सादळे, उपप्राचार्य दिलीप संकपाळ, क्रीडा संचालक डॉ. धनंजय पाटील यांचे प्रोत्साहन लाभले.